लोकसत्ता ५.११.१

# वसईत सात तर नालासोपाऱ्यामध्ये १२ उमेदवारांमध्ये लढत


**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई** : वसई, नालासोपारा मतदारसंघातून १९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले असल्याचे सोमवारी स्पष्ट झाले आहे. यात वसईतून सात व नालासोपाऱ्यातून १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. निवडणूक लढविण्यासाठी पात्र ठरलेल्या आठ उमेदवारांनी माघार घेतली. विशेषतः बंडखोरी केलेले शिवसेनेचे विनायक निकम यांनी अर्ज मागे घेतल्याने महाविकास आघाडीतील फूट टळली.

वसईतून १५ उमेदवारांनी २७ अर्ज दाखल केले **(पान ३ वर)**

## उमेदवारी मागे घेणारे...

वसई, नालासोपारा मतदारसंघातून आठ उमेदवारांनी माघार घेतली आहे. वसईतून शिवसेनेचे विनायक निकम, बविआ प्रविणा ठाकूर, प्रहार जनशक्तीच्या भावना पोकळे व अपक्ष राजकुमार दुबे यांनी अर्ज मागे घेतला आहे. तर नालासोपाऱ्यात प्रविणा ठाकूर, अमर कवाळे दिलीप गायकवाड आणि प्रकाश घाटाळ यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला.




**दिवाळी सणाच्या निमित्ताने ऐतिहासिक वसईच्या किल्ल्यात मोठ्या उत्साहात दीपोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी हजारो दिव्यांच्या रोषणाईने व रंगीबेरंगी रांगोळ्यांनी वसईचा किल्ला उजळला होता. आमची वसई या सामाजिक संस्थेतर्फे हा दीपोत्सव आयोजित केला होता.**

# पदपथावरील अतिक्रमणामुळे पादचारी त्रस्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई** : वसई, विरार शहरातील विविध ठिकाणच्या भागातील पदपथांवर फेरीवाल्यांपाठोपाठ बेकायदा वाहने उभे करण्याचे प्रकार घडू लागले आहेत. आधीच रस्त्यावर कोंडी, त्यातच पदपथही गिळंकृत झाल्याने पादचाऱ्यांना चालणे कठीण होऊन बसले आहे.

आधी फेरीवाले आणि आता वाहने पार्किंग यामुळे चालायचे तरी कुठून, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांनी उपस्थित केला आहे. यासाठी अशा प्रकारे वाहने उभी करून सर्वसामान्य नागरिकांची अडवणूक करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

शहरात वाहने उभी करण्यासाठी वाहनतळ तयार केले नसल्याने वाहने उभी करण्यासाठी नागरिकांना अडचणी येतात. अनेकदा रस्त्याच्या कडेला उभी केलेली वाहने टोइंग करून उचलली जातात. याचा फटका नागरिकांना बसतो. पालिकेने वाहने उभी करण्यासाठी अधिकृत जागा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत ५.११.१९

# सणासुदीला नालासोपारा शहरात वाहतूक कोंडी

लोकसत्ता प्रतिनिधी



**वसई:** दिवाळी सणाच्या निमित्ताने मोठ्या संख्येने नागरिक घराबाहेर पडले होते. शनिवार आणि रविवारी दोन्ही दिवस नालासोपाऱ्यात प्रचंड वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती. या कोंडीमुळे प्रवाशांचे हाल झाले, तर दुसरीकडे याचा फटका रस्त्यावरील वाहनचालकांनाही बसला होता.

मागील काही वर्षांपासून नालासोपारा शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढले आहे. मोठ्या संख्येने वाहनांची वर्दळ ही पूर्व पश्चिम अशा दोन्ही ठिकाणच्या रस्त्यावर वाढली आहे. त्यामुळे सातत्याने या रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते. विशेषतः सणासुदीच्या काळात नालासोपाऱ्यात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. वाहनांची वाढती गर्दी व वाहतूक नियमांचे उल्लंघन करून चालविल्या जाणाऱ्या वाहनचालकांमुळे शनिवार, रविवार सायंकाळी नालासोपारा उड्डाणपुलावर वाहतूक कोंडी झाली होती. पूर्व पश्चिम अशा दोन्ही बाजूने वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या होत्या. तासन्तास प्रवासी नागरिक वाहनांमध्ये अडकून पडल्या होत्या. वाहतूक पोलिसांकडून वाहतूक नियंत्रण केले जात असले तर रस्त्याच्या मधोमध उभी केलेली वाहने, विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीत अधिकच भर पडली होती, असे प्रवाशांनी सांगितले.

### फेरीवाल्यांमुळे कोंडीत भर

दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने मुख्य रस्ते यासह पदपथावर फेरीवाल्यांनी आपली दुकाने थाटली आहेत. त्यामुळे वाहने व प्रवासी यांना ये-जा करण्यासाठी मार्गच शिल्लक नसल्याने अडचणी निर्माण झाल्या होत्या. आधीच रस्ते अपुरे आहेत, त्यातच अशा प्रकारे बेकायदेशीर पणे बसणारे फेरीवाले यामुळे कोंडीत अधिकच भर पडत आहे.

### उपाययोजनेचा अभाव

सणासुदीसह एरवीसुद्धा शहरातील रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. वाहतूक कोंडी सुटावी यासाठी मागील काही वर्षांत कोणत्याच उपाययोजना पालिकेकडून करण्यात आल्या नाहीत. उपाययोजना केल्या नाहीत तर येत्या काळात ही समस्या आणखीनच जटिल बनेल, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त करण्यात येते.

---

हवेचे प्रदूषण मोजणारा फलक शहराच्या बाहेर

# मीरा-भाईंदरमध्ये हवा चांगली असल्याचा दावा खोटा?

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** हवेतील प्रदूषणाची तपासणी करण्यासाठी बसवलेल्या यंत्रणेद्वारे हवेच्या गुणवत्तेची नोंदणी करून त्याच्या आकडेवारीचा आधार घेतला जातो; परंतु ही यंत्रणाही शहराच्या लोकवस्तीऐवजी शहराबाहेर असलेल्या भाईंदरच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात बसवून मीरा-भाईंदरमधील हवा चांगली असल्याचा दावा केला जात असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

मीरा-भाईंदरमध्ये हवेतील प्रदूषण मोजण्यासाठी भाईंदर पश्चिमेच्या सुभाषचंद्र बोस मैदानात हवा प्रदूषण तपासणी यंत्र बसवण्यात आले आहे. ही यंत्रणा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून बसवण्यात आली आहे.

### रोजचा अहवाल केला जातो तयार

या यंत्रातून २४ तास हवेची गुणवत्ता व त्यातील प्रदूषित घटक यांची मोजणी केली जाते. त्याआधारे त्याचा रोजचा अहवालही तयार केला जातो. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नोंदीनुसार १ एप्रिल ते २१ ऑक्टोबरपर्यंत १०३ दिवस हवेची गुणवत्ता चांगली, ७६ दिवस मध्यम गुणवत्तेची, तर २५ दिवस खराब होती, अशी माहिती पालिकेतून देण्यात आली. दिवाळी काळात हवेची गुणवत्ता किती, हे मात्र अजून कळू शकलेले नाही.



### दाटीवाटीच्या भागातील हवेच्या गुणवत्तेचे काय?

**१** शहरात एकीकडे प्रचंड प्रमाणात नवीन बांधकामे, आरएमसी प्लांट, इमारती, काँक्रीट रस्ते, पाण्याची लाइन टाकणे, जुन्या धोकादायक इमारती पाडण्यापासून दिवाळी आदी काळात मोठ्या प्रमाणात फटाके फोडणे आदी सुरू असते. यातून प्रचंड प्रमाणात धूळ, धूर आदी दिसते; परंतु हवेचे प्रदूषण मापण्याची यंत्रणा ही शहरात न बसवता बोस मैदानात बसवण्यात आली आहे. बोस मैदानाच्या पश्चिम, उत्तर आणि दक्षिण दिशेला कोणतीच वस्ती नसून, कांदळवन क्षेत्र, मिठागर आदी आहे. थेट उत्तनच्या डोंगराळ भागापर्यंत वस्ती नाही. उलट नैर्ऋत्य आणि पश्चिमेकडून हवासुद्धा मोकळी वाहत येते.

**२** हवेची गुणवत्ता मोजणारे यंत्र हे सुमारे ३०० मीटर परिसरातील प्रदूषक मोजते, असे प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकारीच सांगतात. म्हणजेच मुख्य आणि वर्दळ-दाटीवाटीच्या शहरात हवेची गुणवत्ता काय, याचे मोजमापच होत नाही. शहराच्या हवेतील प्रदूषणाची नेमकी आकडेवारी कळू नये, यासाठी शहराच्या बाहेर मोकळी जागा असलेल्या सुभाषचंद्र बोस मैदानात हवेतील प्रदूषणाची मोजमाप करणारी यंत्रणा जाणीवपूर्वक बसवली गेल्याची शक्यता नाकारता येत नाही. शहरातील प्रदूषण जास्त असले तरी त्याची नोंदच होत नसल्याने प्रशासनाला शहराची बहुतांशी दिवस हवा चांगली, मध्यम असल्याचे सांगता येते.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पृ.पा.१

# सणासुदीला नालासोपारा शहरात वाहतूक कोंडी

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई:** दिवाळी सणाच्या निमित्ताने मोठ्या संख्येने नागरिक घराबाहेर पडले होते. शनिवारी आणि रविवारी दोन्ही दिवस नालासोपाऱ्यात प्रचंड वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती. या कोंडीमुळे प्रवाशांचे हाल झाले, तर दुसरीकडे याचा फटका रुग्णवाहिकांनाही बसला होता.

मागील काही वर्षांपासून नालासोपारा शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढले आहे. मोठ्या संख्येने वाहनांची वर्दळ ही पूर्व पश्चिम अशा दोन्ही ठिकाणच्या रस्त्यावर वाढली आहे. त्यामुळे सातत्याने या रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते. विशेषतः सणासुदीच्या काळात नालासोपाऱ्यात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. वाहनांची वाढती गर्दी व वाहतूक नियमांचे उल्लंघन करून चालविल्या जाणाऱ्या वाहनचालकांमुळे शनिवार, रविवार सायंकाळी नालासोपारा उड्डाणपुलावर वाहतूक कोंडी झाली होती. पूर्व पश्चिम अशा दोन्ही बाजूने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यामध्ये प्रवासी तसेच रुग्णवाहिकाही अडकून पडल्या होत्या. वाहतूक पोलिसांकडून वाहतूक नियंत्रण केले जात असले तरी रस्त्याच्या मधोमध उभी केलेली वाहने, विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीत अधिकच भर पडली होती, असे प्रवाशांनी सांगितले.



## फेरीवाल्यांमुळे कोंडीत भर

दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने मुख्य रस्ते यासह पदपथावर फेरीवाल्यांनी आपली दुकाने थाटली आहेत. त्यामुळे वाहने व प्रवासी यांना ये-जा करण्यासाठी मार्गच शिल्लक नसल्याने अडचणी निर्माण झाल्या होत्या. आधीच रस्ते अपुरे आहेत. त्यातच अशा प्रकारे बेकायदेशीर पणे बसणारे फेरीवाले यामुळे कोंडीत अधिकच भर पडत आहे.

## उपाययोजनेचा अभाव

सणासुदीसह एरवीसुद्धा शहरातील रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. वाहतूक कोंडी सुटावी यासाठी मागील काही वर्षांत कोणत्याच उपाययोजना पालिकेकडून करण्यात आल्या नाहीत. उपाययोजना केल्या नाहीत तर येत्या काळात ही समस्या आणखीनच जटिल बनेल, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त करण्यात येते.

---

हवेचे प्रदूषण मोजणारा फलक शहराच्या बाहेर

# मीरा-भाईंदरमध्ये हवा चांगली असल्याचा दावा खोटा?

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** हवेतील प्रदूषणाची तपासणी करण्यासाठी बसवलेल्या यंत्रणेद्वारे हवेच्या गुणवत्तेची नोंदणी करून त्याच्या आकडेवारीचा आधार घेतला जातो; परंतु ही यंत्रणाही शहराच्या लोकवस्तीऐवजी शहराबाहेर असलेल्या भाईंदरच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात बसवून मीरा-भाईंदरमधील हवा चांगली असल्याचा दावा केला जात असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

मीरा-भाईंदरमध्ये हवेतील प्रदूषण मोजण्यासाठी भाईंदर पश्चिमेच्या सुभाषचंद्र बोस मैदानात हवा प्रदूषण तपासणी यंत्र बसवण्यात आले आहे. ही यंत्रणा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून बवण्यात आली आहे.

## रोजचा अहवाल केला जातो तयार

या यंत्रातून २४ तास हवेची गुणवत्ता व त्यातील प्रदूषित घटक यांची मोजणी केली जाते. त्याआधारे त्याचा रोजचा अहवालही तयार केला जातो. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नोंदीनुसार १ एप्रिल ते २१ ऑक्टोबरपर्यंत १०३ दिवस हवेची गुणवत्ता चांगली, ७६ दिवस मध्यम गुणवत्तेची, तर २५ दिवस खराब होती, अशी माहिती पालिकेतून देण्यात आली. दिवाळी काळात हवेची गुणवत्ता किती, हे मात्र अजून कळू शकलेले नाही.



## दाटीवाटीच्या भागातील हवेच्या गुणवत्तेचे काय?

१ शहरात एकीकडे प्रचंड प्रमाणात नवीन बांधकामे, आरएमसी प्लांट, इमारती, काँक्रीट रस्ते, पाण्याची लाइन टाकणे, जुन्या धोकादायक इमारती पाडण्यापासून दिवाळी आदी काळात मोठ्या प्रमाणात फटाके फोडणे आदी सुरू असते. यातून प्रचंड प्रमाणात धूळ, धूर आदी दिसते; परतु हवेचे प्रदूषण मापण्याची यंत्रणा ही शहरात न बसवता बोस मैदानात बसवण्यात आली आहे. बोस मैदानाच्या पश्चिम, उत्तर आणि दक्षिण दिशेला कोणतीच वस्ती नसून, कांदळवन क्षेत्र, मिठागर आदी आहे. थेट उत्तनच्या डोंगराळ भागापर्यंत वस्ती नाही. उलट नैऋत्य आणि पश्चिमेकडून हवासुद्धा मोकळी वाहत येते.

२ हवेची गुणवत्ता मोजणारे यंत्र हे सुमारे ३०० मीटर परिसरातील प्रदूषक मोजते, असे प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकारीच सांगतात. म्हणजेच मुख्य आणि वर्दळ-दाटीवाटीच्या ~~शहरात~~ हवेची गुणवत्ता काय, याचे मोजमापच होत नाही. शहराच्या हवेतील प्रदूषणाची नेमकी आकडेवारी कळू नये, यासाठी शहराच्या बाहेर मोकळी जागा असलेल्या सुभाषचंद्र बोस मैदानात हवेतील प्रदूषणाची मोजमाप करणारी यंत्रणा जाणीवपूर्वक बसवली गेल्याची शक्यता नाकारता येत नाही. शहरातील प्रदूषण जास्त असले तरी त्याची नोंदच होत नसल्याने प्रशासनाला शहराची बहुतांशी दिवस हवा चांगली, मध्यम असल्याचे सांगता येते.

Scanned with OKEN Scanner

लोकमत ५.५१९

# घरातून मोबाइल चोरले



मीरा रोड : मीरा रोडच्या शांतीनगर सेक्टर ३ मधील मंगल शांती इमारतीत राहणारे हरिंदर कौल यांच्या घरातून सकाळी हॉलमधील बेडवर ठेवलेले २ मोबाइल अनोळखी तरुणाने चोरून नेले. याप्रकरणी नयानगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० हजार रुपये किमतीचे मोबाइल चोरीला गेले असून पोलिस हवालदार जावेद तडवी तपास करीत आहेत.

# उधारीवरून केली मारहाण

मीरा रोड : मीरा रोडच्या शांती पार्क, पूनम कॉम्प्लेक्स भागात राहणारे अक्षय अशोक मिश्रा हे शीतल नगर येथील टाइमलेस हॉटेलमध्ये बाकी असलेले उधारीचे पैसे मागण्यासाठी गेले होते. त्यावेळी कामगारांसमोर पैसे मागितल्याचा राग येऊन पवन राय, सोनू राय व इतर पाच अनोळखी व्यक्तींनी बेकायदा जमाव जमवत मिश्रा यांना शिवीगाळ ठरत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच कोणाला सांगितले तर जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी मीरा रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सहायक पोलिस निरीक्षक विजय वाघमारे हे तपास करत आहेत.

नवाकाळ ५१.५

# गीता जैन अपक्ष लढण्यावर ठाम

■ मीरा

भाईंदर मतदार संघातून गीता जैन या अपक्ष लढण्यावर ठाम आहेत. गीता जैन यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आपले समर्थन दिले होते. महायुतीतून गीता जैन मीरा भाईंदर मतदार संघातून लढण्यास इच्छुक होत्या. मात्र उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी उमेदवार म्हणून नरेंद्र मेहता यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. त्यामुळे गीता जैन यांनी नाराज होत अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता. या मतदार संघातील भाजपामधील अंतर्गत वाद हा २०१९ च्या निवडणुकीत ही रंगला होता. यावर्षीही तोच प्रकार घडला भाजपाने आमदार गीता जैन यांना उमेदवारी नाकारून पुन्हा नरेंद्र मेहता यांना उमेदवारी दिली असून काँग्रेसने मुझ्झफर हुसेन यांना निवडणूक रिंगणात उतरविले. त्यामुळे तिरंगी चुरशीची लढत होणार असल्याचे चित्र निर्माण झाल्याचे दिसते.

यावर गीता जैन म्हणाल्या की, मी उमेदवारीवर ठाम असून निवडणुकीला सामोरे जाणार आहे. भाजपाने मुख्यमंत्र्यांना आश्वासन दिले होते, उमेदवार तुमचा आणि चिन्ह आमचे, मात्र तसे झाले नाही त्यामुळे मुख्यमंत्री देखील दुखावले आहेत.

Scanned with OKEN Scanner

म. टा. पु. पा. १

# सुरक्षासाधनांविना आगीशी दोन हात

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदर महापालिकेच्या अग्निशमन जवानांच्या सुरक्षेसाठी गणवेश व इतर साहित्यखरेदीचा निर्णय मार्चमध्ये घेण्यात आला. मात्र, या निर्णयाला आठ महिने उलटूनही आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. परिणामी, जीव धोक्यात घालून जवानांना काम करावे लागत आहे. शुक्रवारी रात्री फर्निचर कंपनीला लागलेल्या भीषण आगीवेळीदेखील हे दृश्य पाहायला मिळाले.

भाईंदर पश्चिमेच्या आझादनगर झोपडपट्टीला फेब्रुवारीत भीषण आग लागली होती. त्यावेळी महापालिकेच्या अग्निशमन जवानांना सुरक्षा साधने म्हणजेच हेल्मेट, हातमोजे, जॅकेट व बूट उपलब्ध मनुष्यबळाच्या तुलनेत अपुरे असल्यामुळे आगीवर नियंत्रण मिळवताना मोठी कसरत करावी लागली होती. तत्पूर्वी विविध घटनांमध्ये सुरक्षा साधनांअभावी जवान जखमी झाल्याच्या घटनाही घडल्या होत्या. त्यामुळे जवानांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता.

अखेर मार्चमध्ये महापालिका आयुक्त संजय काटकर यांनी अग्निशमन व कंत्राटी मजुरांसाठी गणवेश खरेदीचा निर्णय घेतला. हा निर्णय घेऊन आठ महिने उलटले आहेत. मात्र, त्यानंतरही जवानांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक असणाऱ्या साधनसामग्रीपासून ते वंचित आहेत. त्यांना पाच वर्षांपूर्वीचे सुरक्षा साहित्य वापरावे लागत आहे. याच कारणास्तव मिरागाव येथे फर्निचर कारखान्याला शुक्रवारी रात्री लागलेल्या भीषण आगीवर नियंत्रण मिळवताना विविध अडचणींना जवानांना सामोरे जावे लागले.

कंत्राटी जवानांकडे सुरक्षा जॅकेट नसल्यामुळे त्यांना पुढे होऊन पाण्याचा फवारा मारून नियंत्रण मिळवण्यात अडचणी आल्या. त्यांना बूट व हेल्मेट पुरवण्याकडे कंत्राटदाराकडून पाठ फिरवण्यात आली आहे. यातील अनेक जवान मधल्या काळात आगीवर नियंत्रण मिळवताना जखमी झाले आहेत. मात्र, त्यांना उपचारांसाठी आवश्यक मदतही महापालिकेकडून मिळालेली नाही. त्यामुळे आणखी किती दिवस जीव धोक्यात घालून काम करायचे, असा प्रश्न खासगीत जवानांकडून उपस्थित केला जात आहे. यासंदर्भात अग्निशमन दलाचे प्रमुख प्रकाश बोराडे यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी प्रतिसाद दिला नाही.



## अनेक वाहने नादुरुस्त

मिरा-भाईंदर अग्निशमन दलाने मधल्या काळात अत्याधुनिक वाहने खरेदी केली आहेत. त्यात अनेक जुनी वाहने देखील आहेत. यातील अनेक वाहनांची देखभाल दुरुस्ती करण्यात न आल्याने ती नादुरुस्त आहेत. काही अग्निशमन केंद्रावर दुरुस्तीअभावी वाहने धुळखात पडल्याचे देखील समजते. काही वाहनाचे सायरन ही बंद असल्याचे कळते.

## जीव धोक्यात घालून जवानांवर काम करण्याची वेळ

- मिरा-भाईंदर महापालिकेचा मार्चमध्ये सुरक्षा साहित्यखरेदीचा निर्णय
- अंमलबजावणी न झाल्याने आवश्यक साहित्यांची वानवा

## पालिकेची यंत्रणा सक्षम कधी होणार?

भाईंदरमध्ये मागील वर्षभरात भीषण आगीच्या दोन घटना घडल्या आहेत. या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी लगतच्या वसई, विरारसह मुंबई महापालिकेची मदत घ्यावी लागली आहे. शहराची लोकसंख्या वर्षानुवर्षे वाढत आहे. असे असले तरी महापालिकेच्या अग्निशमन दलातील अनेक पदे रिक्त आहेत. इतर अनेक बाबींचीही आवश्यकता आहे. त्यामुळे महापालिका स्वतःची यंत्रणा सक्षम करणार तरी कधी, असा प्रश्न जागरूक नागरिक उपस्थित करत आहेत.


पुढारी पा. ३

# उत्तनच्या डोंगरी येथे रिक्षा, बसची समोरासमोर टक्कर

## रिक्षाचालकाच्या भावाचा मृत्यू तर पत्नी, मुलगी कोमात; बससह चालकाला घेतले ताब्यात

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर येथील उत्तनच्या डोंगरी बस स्टॉपच्या वळणावर रिक्षा व पालिकेच्या परिवहन बसची समोरासमोर टक्कर झाल्याची घटना सोमवारी मध्यरात्री १.३० वाजताच्या सुमारास घडली. यात रिक्षा चालकाच्या भावाचा मृत्यू तर चालकासह पत्नी व ४ वर्षीय मुलगी गंभीर जखमी होऊन कोमात गेले आहेत. याप्रकरणी उत्तन सागरी पोलिसांनी बससह चालकाला ताब्यात घेतले असून त्याच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. बस चालकाचे नाव मढीवालर (२५) असे असून त्याने यापूर्वी देखील एका रिक्षाला ठोकले होते. त्यात रिक्षातील तब्बल तीन जणांचा जागीच मृत्यू झाला होता. यावेळी त्याला परिवहन विभागाने २ महिने निलंबित करून पुन्हा कामावर घेतले. यानंतर सोमवारी पुन्हा झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाल्याची पुनरावृत्ती झाली आहे.



घटनेचे सविस्तर वृत्त असे कि, रिक्षा चालक बाला राजभर (३०) आपली रिक्षा क्रमांक एमएच ०४ केएक्स ८०७५ मधून भाऊ पंकज (१८), पत्नी अनिता (२८) व मुलगी अनिषा (४) यांना मुर्धा गाव येथून चौक येथे सोमवारी रात्री १.३० वाजताच्या सुमारास आपल्या चौक येथील घरी घेऊन जात होता. त्यावेळी रिक्षाची डोंगरी बस स्टॉपच्या वळणावर उत्तन येथून भाईंदरकडे जाणाऱ्या पालिकेच्या परिवहन बस क्रमांक एमएच ०४ जेके ३४७७ शी समोरासमोर टक्कर झाली. हा अपघात इतका भयानक होता कि त्यात रिक्षातील सर्वजण गंभीर जखमी झाले. सर्व जखमींना भाईंदरच्या जोशी रुग्णालयात उपचारासाठी आणले असता रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना दाखल करून न घेता कांदिवलीच्या शताब्दी रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला.

जखमींना शताब्दी रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी रुग्णालयाने चालक नसल्याचे कारण देत रुग्णवाहीका सुद्धा उपलब्ध करून दिली नाही, असा आरोप जखमींच्या नातेवाईकांनी केला आहे. यानंतर जखमींना मिळेल त्या वाहनाने शताब्दी रुग्णालयात नेत असताना पंकज याचा रस्त्यातच मृत्यू झाला. तर रिक्षा चालक बाला, त्याची पत्नी अनिता व मुलगी अनिषा कोमात गेल्याचे तेथील डॉक्टरांकडून सांगण्यात आले.

### बसचालकावर गुन्हा दाखल

या घटनेनंतर उत्तन सागरी पोलिसांनी बस चालकावर गुन्हा दाखल केला असून या बस चालकाने यापूर्वी केलेल्या अपघतामुळे अनेकजण दगावल्याने बेदारकारपणे बस चालविणाऱ्या या बस चालकावर कठोर कारवाईच्या मागणीसाठी रिक्षा चालकांनी सायंकाळी ५ वाजता भाईंदर पोलीस ठाण्यात धडक देत सहाय्यक पोलीस आयुक्तांची भेट घेतली. सहाय्यक पोलीस आयुक्तांनी बस चालकावर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर रिक्षा चालकांनी जोशी रुग्णालयातील शवविच्छेदन केंद्राबाहेर गर्दी केली.

Scanned with OKEN Scanner

पुढारी पा. क्र. १

# रश्मी शुक्लांना पोलीस महासंचालकपदावरून अखेर हटवले!

## विरोधकांच्या रेट्यामुळे निवडणूक आयोगाचा निर्णय

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची अखेर केंद्रीय निवडणूक आयोगाने बदली केली आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विरोधकांच्या मागणीनुसार केंद्रीय निवडणूक आयोगाने हा मोठा निर्णय घेतला. शुक्ला यांना या पदावरून दूर करण्यासाठी काँग्रेसने निवडणूक आयोगाला तीनवेळा निवेदनेही दिली होती.

निवडणूक आयोगाने महाराष्ट्र आणि झारखंडच्या विधानसभा निवडणुका जाहीर केल्यानंतर मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी काँग्रेसची बदल्यांबाबतची मागणी फेटाळून लावली होती. आता मात्र निवडणूक आयोगाने रश्मी शुक्ला यांना हटवले आहे. रश्मी शुक्ला राज्यात पोलिस महासंचालक राहिल्यास निष्पक्ष निवडणुका होणार नाहीत, अशी भीती काँग्रेसने व्यक्त केली होती. रश्मी शुक्ला यांचा पदभार त्यांच्या नंतरच्या सर्वात वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याकडे सोपवण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांना दिले आहेत. मुख्य सचिवांनी महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालकपदावरील नियुक्तीसाठी ५ नोव्हेंबरला दुपारी १ वा. पर्यंत तीन आयपीएस अधिकार्यांचे पॅनेल पाठवण्याचे निर्देशही दिले आहेत.

**पहिल्या महिला पोलिस महासंचालक**

रश्मी शुक्ला या राज्याच्या पहिल्या महिला पोलिस महासंचालक बनल्या होत्या. शुक्ला १९८८ च्या बॅचच्या आयपीएस अधिकारी आहेत. जानेवारी २०२४ मध्ये त्यांची पोलिस महासंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. याच वर्षी जूनमध्ये त्या निवृत्त होणार होत्या. मात्र सरकारने त्यांना मुदतवाढ दिली होती.



### मविआ नेत्यांच्या फोन टॅपिंगमध्ये नाव

● रश्मी शुक्ला यांचे नाव महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या फोन टॅपिंग प्रकरणात ओढले गेले होते. नंतर त्यांना या प्रकरणात क्लीन चिट देण्यात आली होती.

### बदलीस इतके दिवस का? : नाना पटोले

● आम्ही केलेल्या तक्रारीची केंद्रीय निवडणूक आयोगाने दखल घेतल्याबद्दल स्वागत आहे. पण पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्यासाठी राज्य सरकारला इतके दिवस का लागले, असा सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

Scanned with OKEN Scanner

पुढारी पृ. पा. क्र. १

# मिरा-भाईंदर, वसईत ३८ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालयातील ३८ पोलीस निरीक्षकांची मुंबई शहरात बदली करण्यात आली आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना यांनी या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत.

बदली झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये वसईतील विविध पोलीस ठाण्यांचे निरीक्षक समाविष्ट आहेत. यामध्ये मांडवी पोलीस ठाण्याचे संजय हजारे, तुळींजचे शैलेंद्र नगरकर, नायगावचे रमेश भामे, पेल्हारचे जितेंद्र वनकोटी, वालिवचे जयराम रणवरे, कुमार गौरव धादवड, नालासोपाराचे सदाशिव निकम, आचोळचे चंद्रकांत सरोदे, माणिकपूर- राजू माने, वसईचे रणजीत आंधळे यांचा या बदल्यांमध्ये समावेश आहे.

तसेच, मिरा-भाईंदरमधील राजेंद्र कांबळे, विजयकुमार चव्हाण, बाळासाहेब पवार, विलास सुपे, दिलीप राख, सुधीर गवळी, प्रफुल्ल वाघ, विवेक - सोनावणे, विजया पवार, राहुलकुमार पाटील, संजय केदारे, विठ्ठल चौगुले, सुधीर चव्हाण, सुशीलकुमार शिंदे, ऋषिकेश पवळ, सागर टिळेकर, राहुल सोनावणे, मिलिंद साबळे, सचिन कोतमिरे, शिवानंद देवकर, जिलानी सय्यद, श्याम आपेट, मंगेश

अंधारे, अब्दुलहक देसाई, अशोक कांबळे, संतोष चौधरी, जितेंद्र पाटील, प्रकाश मासाळ या पोलीस निरीक्षकांची देखील मुंबई शहरात बदली करण्यात आली आहे. या बदल्यांचा उद्देश निवडणुका शांततेत आणि निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी असल्याचे सांगण्यात येत आहे.

# नालासोपाऱ्यात टुरिस्टच्या गाडीमध्ये आढळून आला मृतदेह

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

नालासोपारा पूर्व ९० फुटी रोड येथे एका टुरिस्टच्या गाडीमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे. दरम्यान गाडीमध्ये मृतदेह आढळून आल्याच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

जवळच असलेल्या दुकानदाराने दिलेल्या माहितीनुसार रविवारी दुपारपासून गाडी चालक मद्यपान करून नशेत होता. दुकानाच्या शेजारी गाडी लावल्यामुळे दुकान मालकाने त्याला गाडी बाजूला लावण्यास सांगितले. यावेळी गाडी चालक गाडी बाजूला लावून पुन्हा मद्यपान करण्यासाठी गेला व सायंकाळी पूर्णत: नशेत परत आला. ही गाडी मुख्य रस्त्यावरच असल्याच्या कारणाने आजूबाजूच्या लोकांनी त्याला उठवण्याचा प्रयत्न केला. मात्र, गाडी चालकाकडून कोणतेही उत्तर न आल्याने लोकांना याबाबत संशय आला. लोकांनी तत्काळ पोलिसांना याची सूचना दिली. पोलीस घटनास्थळी दाखल झाल्यानंतर या ठिकाणी गाडीमध्ये गाडी चालकाचा मृत्यू झाल्याचे पोलिसांना समजून आले. यावेळी पोलिसांनी तत्काळ पंचनामा करत शव शवविच्छेदनासाठी पाठवले. दरम्यान गाडीत कोणतेही ओळखपत्र नसल्याने पोलीस ही गाडी कुठून आली, कोणाची आहे, याबाबत शोध करत आहेत.

Scanned with OKEN Scanner

नवभारत ५.११.३

# मीरा-भाईंदर चुनाव में 17 भिड़ेंगे

## निर्दलीय बिगाड़ सकते हैं हार-जीत का समीकरण, 6 उम्मीदवारों ने अपने नाम वापस लिए

विनोद मिश्रा@नवभारत

**भाईंदर.** 145 मीरा - भाईंदर विधानसभा सीट पर नामांकन वापस लेने की अंतिम तिथि के बाद कुल 17 उम्मीदवारों का चुनावी भिड़ंत होने वाला है. नामांकन वापस लेने वालों में बीजेपी के उम्मीदवार नरेंद्र मेहता की पत्नी सुमन मेहता, पूर्व बीजेपी पार्षद सुरेश खंडेलवाल, चंद्रकांत मोदी, बविआ की उम्मीदवार फ्रीडा मोराइस, एजाज खतीब और रमजान खत्री का समावेश है. जिन 6 उम्मीदवारों ने अपने नाम वापस लिए हैं, उनमें से 4 उम्मीदवारों ने बीजेपी के समर्थन में तो फ्रीडा और खत्री ने कांग्रेस के समर्थन में अपना नामांकन वापस लिया है.चुनावी मैदान में अब महायुति से बीजेपी के नरेंद्र मेहता, महाविकास आघाड़ी से कांग्रेस के मुजफ्फर हुसैन, मनसे से संदीप राणे, बसपा से कालीचरण हरिजन तथा इसके अलावा राज्य स्तर पर मान्यता प्राप्त राष्ट्रीय स्वराज्य सेना से एड. अरुण कुमार खेड़िया, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) से अरुणा चक्रे, हिंदू समाज पार्टी से सुरेन्द्र कुमार जैन व सरदार वल्लभभाई पटेल पार्टी से सत्य प्रकाश चौरसिया और विधायक गीता भरत जैन, पूर्व नगराध्यक्ष अरुण कदम, पूर्व नगरसेवक हंसुकुमार पांडे और अन्य 6 उम्मीदवार निर्दलीय चुनाव लड़ रहे हैं.



### गीता-मेहता और हुसैन में त्रिकोणीय मुकाबला

इस विधानसभा सीट पर अब सीधे -सीधे वर्तमान विधायक और निर्दलीय उम्मीदवार गीता भरत जैन, बीजेपी के नरेंद्र मेहता तथा कांग्रेस के मुजफ्फर हुसैन के बीच त्रिकोणीय मुकाबला होने के पूर्ण आसार हैं. 2019 के विधानसभा चुनाव में अविभाजित शिवसेना ने खुलकर निर्दलीय उम्मीदवार गीता जैन का समर्थन किया था. इस बार के चुनाव में विभाजित शिवसेना के उद्धव शिवसेना का समर्थन कांग्रेस को और शिंदे शिवसेना का समर्थन बीजेपी को है, जिससे इस सीट पर त्रिकोणीय कांटे की टक्कर निश्चित है.

### मनसे, बीजेपी-कांग्रेस दोनों को पहुंचाएगी नुकसान

वहीं दूसरी तरफ देखें तो अन्य निर्दलीय उम्मीदवारों में खुद के दम पर चुनाव जीतने की क्षमता तो नहीं नजर आ रही. लेकिन वोट काटकर वे चुनाव में मुख्य प्रतिद्वंदी उम्मीदवारों के हार जीत का समीकरण बिगाड़ने की ताकत अवश्य रखते हैं. कुल मिलाकर देखें तो मनसे के संदीप राणे बीजेपी और कांग्रेस दोनों का कुछ हद तक वोट काटेंगे. निर्दलीय हंसुकुमार पांडे कई वर्षों तक कांग्रेस से जुड़े रहे हैं. लेकिन उत्तर भारतीय होने के नाते वे भी कांग्रेस और बीजेपी को नुकसान पहुंचा सकते हैं. पूर्व उपनगराध्यक्ष अरुण कदम की पकड़ हर समाज के लोगों पर रही है और वैसे भी कदम करीब-करीब सभी मुख्य राजनीतिक दलों में पदाधिकारी रहे हैं, तो वे भी कांग्रेस, बीजेपी और निर्दलीय गीता जैन के वोट भी काट सकते हैं.

### धर्म के पालन का किया वादा, विकास के लिए 44 संकल्प लेने का वचन

बीजेपी के नरेंद्र मेहता और महायुति के घटक दल शिंदे शिवसेना के प्रताप सरनाईक के बीच विगत कुछ वर्षो से रिश्ते ठीक नहीं रहे हैं. बीजेपी के पदाधिकारियों का हमेशा से ही यह आरोप रहा है कि शिवसेना महायुति धर्म का पालन नहीं करती है और बीजेपी के पदाधिकारियों को दबाने की राजनीति करती है. सोमवार को महायुति के सभी घटक दलों ने मिलकर एक संयुक्त पत्रकार परिषद बुलाई थी, जिसमें शिवसेना से विधायक प्रताप सरनाईक, बीजेपी से नरेंद्र मेहता, एड.रवि व्यास, आरपीआई (आठवले) से देवेंद्र शेलेकर, राकांपा (अजीत) से आसिफ शेख तथा सभी दलों के पदाधिकारी मौजूद थे. प्रेस वार्ता को संबोधित करते हुए सरनाईक ने 145 से नरेंद्र मेहता और 146 से खुद के लिए सभी पदाधिकारी, कार्यकर्ताओं को जमीनी स्तर पर कार्य करने का आवाहन किया. मेहता ने भी मीरा-भाईंदर के विकास के लिए 44 संकल्प लेने का वचन दिया. एड. रवि व्यास ने स्थानीय स्तर के मतभेद मिटाकर पार्टी द्वारा दिए गए उम्मीदवार मेहता के लिए कार्य करने का संकल्प लिया और महायुति के सभी घटक दलों ने युति धर्म के पालन का वादा किया.

Scanned with OKEN Scanner

Hindustan Times

# Ahead of elections, EC transfers Maharashtra DGP Rashmi Shukla

MOHAMED THAVER
MUMBAI, NOVEMBER 4



Rashmi Shukla is a 1988 batch IPS officer

THE ELECTION Commission (EC) on Monday transferred Maharashtra DGP Rashmi Shukla, a 1988 batch IPS officer, two weeks ahead of Assembly elections in the state. Earlier, there had been a formal complaint against her by Maharashtra Congress chief Nana Patole, alleging political bias towards the BJP and sought to have her transferred for free and fair polls.

The EC had also pulled up Shukla and Maharashtra Chief Secretary for partial compliance with its orders seeking transfer of officers. State Election Commission (SEC) officials, however, said that the EC order had not mentioned any reason for the transfer.

Mumbai Police Commissioner Vivek Phansalkar has been given additional charge of the post of DGP till a new DGP is appointed. The EC asked the government to send the names of three senior officers, following

CONTINUED ON PAGE 2




## Election Commission to allot 'whistle' symbol to BVA

The Election Commission of India (ECI) on Monday informed the Bombay High Court that Bahujan Vikas Aghadi (BVA) would be allotted the 'whistle' symbol for the upcoming Maharashtra Assembly election. In January this year, the ECI had allocated the symbol to the Janata Dal (United). Senior advocate Akshay Shinde, representing the ECI, submitted a letter received from the JD(U) informing about its decision to not contest the Maharashtra polls. The BVA had approached the ECI in August requesting for the 'whistle' symbol but it was turned down. Subsequently, it moved the Bombay High Court.


Scanned with OKEN Scanner

Mid day

**DGP RASHMI SHUKLA TRANSFERRED ON EC ORDERS**

# STATE TOP COP'S JOB HINGES ON NEW GOVT

## With DGP sent on compulsory leave following complaints from opposition, Mumbai police commissioner given temporary charge




***'The new government will make a decision after the elections. For now, [Shukla] has been sent on compulsory leave based on the ECI's orders'*** Sujata Saunik, chief secretary

**FAIZAN KHAN**
faizan.khan@mid-day.com

THE fate of Rashmi Shukla, Maharashtra's first woman Director General of Police (DGP) and a 1988-batch IPS officer, hinges on the results of the Maharashtra Assembly elections. The next government will decide whether she will continue as DGP or retire, following the Election Commission of India's (ECI) order for her removal ahead of the upcoming polls. "We have received a letter from the ECI, based on which she has been sent on compulsory leave, and the names of three eligible officers for the next DGP have been forwarded to the ECI," said Maharashtra Chief Secretary Sujata Saunik. » **P06**

Rashmi Shukla, Maharashtra's first woman DGP. **FILE PIC**

Scanned with OKEN Scanner

mid day

mid-day Tuesday, November 5, 2024 | Mumbai | www.mid-day.com | twitter.com/mid_day | epaper.mid-day.com

# Vasai waste collector kills co-worker, then dies of heart attack

## Accused tried to destroy evidence, set body on fire




The police had initially filed an ADR

**SAMIULLAH KHAN**
samiullah.khan@mid-day.com

NOV 1
Day of the incident

A 45-YEAR-old garbage collector identified as Raju was allegedly beaten to death by an elderly man in Vasai on Friday (November 1), who later died of a heart attack two days after the incident on Sunday.

The accused, identified as Prakash Merwa, 75, also a garbage collector, attempted to dispose of the evidence by setting the victim's body on fire near a foot overbridge and fled the scene.

The police said that they received a call about the fire, and only after reaching the spot, they discovered the body of the victim.

The discovery of the partly burned body initially led the Vasai Government Railway Police (GRP) to register an Accidental Death Report (ADR).

Upon examining the scene and noticing suspicious blood clots, an autopsy was conducted, which revealed head injury as the cause of death, following which a case was registered and a thorough investigation was launched.

The police said that they examined CCTV footage and spoke to residents where the alleged incident took place.

Assistant Commissioner of Police Kishore Shinde (GRP) said that further probe into the matter revealed that Raju, at the time of the incident, was accompanied by other scrap collectors identified as Ankit Teniram, 25, and Babban Channa Roy, 35.

The police said that the duo were detained for investigation and revealed Merwa and Raju had a scuffle, and Raju, who was in an inebriated condition, picked up a bamboo stick to struck Merwa, but the latter snatched the stick and beat Raju to death with it before fleeing the scene.

After the police began searching for the accused following the confession from the duo, it was discovered that he had died due to a cardiac arrest on Friday under the jurisdiction of Waliv Police Station, said senior inspector Angha Satavse from Vasai government railway police (GRP).